ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

**17.**

# भारतीय प्रषासन नागरी विकासाच्या दिषेने

**प्रा.डॉ. कदम डी.एम.**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
नागनाथ कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, औंढा ना. हिंगोली

15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वांतत्र्य मिळाले व 26 जानेवारी 1950 पासून भारताची राज्यघटना अमलात आणली. राज्य घटनेच्या 40 व्या कलमात घटकराज्यानी ग्रामीण भागात पंचायतीची स्थापना करून त्यांना शासनाचा एक घटक मानून ग्रामीण विकासाचे कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले अधिकार द्यावेत असे त्यात नमूद करण्यात आले. परंतू नागरी शासनाचा उल्लेख भारतीय राज्यघटनेत कुठेही केलेला दिसून येत नाही. या संदर्भात राज्यघटनेच्या 7 व्या परिशिष्टात सामाविष्ट करण्यांत आलेल्या राज्यसूचीमध्ये मात्र नागरी शासनाचा उल्लेख आला आहे. भारतीय राज्य घटनेत व त्यामधील राज्यसूचीत नागरी स्थानिक शासन, त्याचे स्वरूप, रचना व कार्ये तसेच त्याच्या उत्पन्नाची साधने या सर्व बाबीविषयी निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सरकाला देण्यात आला.

**उद्देष :** 1) नागरी प्रशासनासंदर्भात केंद्रसरकारच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

2) केंद्रसरकारने नागरी प्रशासनसाठी आखलेल्या उपकृपाचा आढावा घेणे.

3) नागरी प्रशासनात केंद्र सरकारच्या उपकृमामुळे कितपत विकास झाला हे जाणून घेणे.

नागरी संस्था प्रभावीपणे कार्य करतील यासाठी केंद्र व राज्य सरकारने प्रत्यक्षपणे महत्वाचे योगदान दिले हे उल्लेखनीय असून त्यामुळेच नागरी संस्था विकासाच्या टप्प्यावर येऊन पोहचल्या. या संदर्भात केंद्र व राज्यसरकारांनी जे महत्वाचे निर्णय घेतले त्यातील काहीबाबी खालील प्रमाणे नमुद करता येतील.

**1) स्थानिक वित चौकषी आयोग (1949.1951):–** केंद्र सरकारने हा आयोग नेमून नागरी स्थानिक शासनाच्या आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करून या संस्थाना आर्थिकदृष्टया प्रबळ करण्यासाठी जिल्हापातळीवर एक स्वतंत्र कर विभागाची स्थापना करावी अशी शिफारस केली. नागरी संस्थाना भेडसावणाऱ्या आर्थिक बाबीचे निराकरण करण्यासाठी इतर अनेक शिफारशी या आयोगाने केल्या होत्या.

**2) कर चौकषी आयोग (1953 – 54) :–** केंद्र सरकाने इ.स.1953 साली या आयोगाची निर्मिती केली. कर चौकशी आयोगाने देशातील नगरपालिकांना करापोटी मिळणारी रक्कम अपूरी असल्यामुळे हया संस्था आपली कार्ये पार पाडू शकत नाहीत, असे स्पष्ट केले. त्यासाठी केंद्र सरकारने आपल्या उत्पन्नाचा काही भाग या संस्थाना द्यावा, अशी शिफारस या आयोगाने केली. तसेच केंद्र सरकारने या संस्थासाठी जी रक्कम त्याना वर्ग केली, ती या नागरी संस्थाना नागरी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांच्या मर्जीप्रमाणे खर्च करण्यास परवानगी द्यावी असेही कर चौकशी आयोगाने सुचविले.

**3) नगरपरिषद कर्मचारी प्रषिक्षण समिती (1963):–** केंद्र सरकाने नेमलेली एक समिती. या समितीने नागरी प्रशासनातील कर्मचाऱ्याच्या प्रशिक्षणसाठी केंद्रीय व राज्य पातळीवर स्वंतत्र प्रशिक्षण संस्था निर्माण करण्यात याव्यात. अशी शिफारस समितीने सरकारला केली. या शिफारशीनुसार केंद्रसरकारने भारतीय लोकप्रशासन संस्था नवी दिल्ली. येथे प्रशिक्षण केंद्र स्थापन केले. यास ‘नगरपालिका प्रशासन प्रशिक्षण व संशोधन केंद्र’ म्हणुन ओळखले जाते. याबरोबरच भारतात लखनौ, हैद्राबाद, कलकत्ता व मुंबई या चार ठिकाणी विभागीय प्रशिक्षण केंद्र स्थापन करून नागरी प्रशासनातील अधिकारी – कर्मचाऱ्याना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

**4) ग्रामीण व नागरी संबंध समिती (1963 – 1966):–** केंद्र सरकारने नेमलेल्या या समितीने नागरी व ग्रामीण प्रशासनाच्या सर्व पैलूचा अभ्यास करून आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला. या अहवालात नगर विकास, नागरी शासन संस्थाची रचना, नगरनियोजन व त्यासाठी लागणारी यंत्रणा, कर्मचारी व्यवस्था नागरी संस्थाच्या आर्थिक उत्पनाची साधने, जनतेचा नागरी प्रशासनातील सहभाग इ. बाबीचा अभ्यास तसेच ग्रामीण व नागरी संबंधाची चौकशी अशा अनेक शिफारशी केंद्र सरकाला केल्या.

**5) नगरपालिका कर्मचारी सेवा नियम समिती (1965 – 1968):–** देशातील व राज्यातील नागरी संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्याचे सेवा नियम काय असावेत. यासाठी ही समिती नेमण्यात आली होती. या समितीने विविध राज्यातील अधिकाऱ्याचे राज्यनिहाय वर्गीकरण करून त्यांचा एक स्वतंत्र सेवा वर्ग निर्माण करावा, असे सुचविले, त्याचबरोबर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी निश्चित करून कर्मचाऱ्याना सेवाशास्वती देण्याची शिफारस केंद्र व राज्य सरकारांना केली. कर्मचाऱ्यासाठी या समितीने अनेक उपयुक्त सूचना सरकारला केल्या.

**6) प्रषासकीय सुधारणा आयोग :–** प्रशासकीय सुधारणा आयोगाने देशातील नागरी शासनाच्या विविध समस्यांचा अभ्यास करण्यसाठी एक उपसमिती नेमली होती. या उपसमितीने देखील ग्रामीण नागरी संबंध समितीप्रमाणेच नागरी संस्थाच्या बाबतीत अनेक उपाय योजना सुचविल्या या मुळेच नागरी शासनाच्या इतिहासात वरील सर्व समित्यानी व आयोगांनी ज्या उपाययोजना सुचविल्या त्यांचा स्विकार करून या संस्था कालांतराने नागरी भागात राहणाऱ्या जनतेच्या विश्वासास पात्र ठरल्या.

भारतीय नियोजन मंडळाच्या Task Force ने इ.स. 1983 साली देशातील नागरी स्थानिक संस्थाचे आर्थिक अधिकार व्यापक करून त्यांच्या निवडणुका नियमित घेण्यात याव्यात, कर्मचाऱ्याना प्रशिक्षण देऊन नागरी विकासाच्या जिल्हा स्तरावरील सर्व सरकारी यंत्रणा नगरपालिकेत विलिन करण्यात यावे, अशी महत्वाची शिफारस केली होती.

केंद्र सरकारने केवळ आयोग व समित्या नेमल्या नसून अनेक प्रकारचे चर्चा, परिसंवाद, संम्मेलने आयोजित करून, नागरी प्रशासनाच्या विविध कार्यावर जनतेचे लक्ष वेधले. काही महत्वाच्या राष्ट्रीय संम्मेलने व परिसंवादाचा थोडक्यात आढावा खालील प्रमाणे होय.

**1) आखिल भारतीय महापौर परिषद संम्मेलन :–** राष्ट्रीय पातळीवर महापौर परिषद इ.स. 1958 पासून कार्यरत असून या परिषदेचे वार्षिक संम्मेलन दरवर्षी केंद्रीय नगरविकासमंत्र्याच्या अध्यक्षते खाली आयोजित केले जातात. ही परिषद महापौरांना त्यांच्या महापालिकेत भडेसावणाऱ्या प्रश्नासंबंधी चर्चा करून सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते. शिवाय महापौरांचे अधिकार, कार्ये, कायद्यातील, त्रुटी, त्या दुरूस्ती करण्यासंबंधी उपाययोजना, आर्थिक बाबीवर चर्चा, विचारांची देवाणघेवाण इत्यादीवर चर्चा केली जाते.

**2) महापालिका आयुक्तांचे संम्मेलनः–** भरतात महापालिका आयुवतांचे पहिले संम्मेलन इ.स. 1965 साली. दिल्ली महानगरपालिकेच्या आयुक्तांने पुढाकार घेऊन आयोजित केले होते. या संम्मेलनात देशातील महानगरपालिकेच्या समान स्वरूपाच्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली. विशेषतः नागरी सुविधाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी महापालिका आयुक्ताने त्यामध्ये बजावलेली भूमिका, वितीय बाबी यासारख्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली. या संम्मेलनात आखिल भारतीय महापौर परिषद व आयुक्ताचे संम्मेलन वेगवेगळे घेऊ नयेत, असे ठरले. त्यांचे विलीनिकरण करण्यात आले व त्यास 'महानगरपालिका संम्मेलन' असे नाव देण्यात आले.

असेच राज्य पातळीवर नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचे संम्मेलने घेऊन त्यांना येणाऱ्या अडचणी सोडविण्याचे कार्ये करण्यात येते.

**3) स्थानिक स्वशासन मंत्र्याचे संम्मेलन :–** देशातील सर्व घटकाराज्याच्या स्थानिक स्वशासन मंत्र्याचे संम्मेलने केंद्रीय विकास मंत्री हे आयोजित करून नागरी प्रशासनात भेडसावणाऱ्या प्रश्नावर चर्चा घडवून

आनतो. या संम्मेलनास राज्याचे गृहनिर्माणमंत्री, नगरनियोजनमंत्री यानाही आमंत्रित केले जाते. असे संम्मेलने आयोजित करून नागरी विकासात येणाऱ्या अडचणी केंद्रीय नगर विकास मंत्री जाणून घेतो.

**4) नगरविकास मंत्रालय :–** या मंत्रालयाची स्थापना इ.स. 1985 साली करण्यात आली. यापूर्वी नागरी विकासाची जबाबदारी केंद्रीय आरोग्य मंत्रालयावर टाकण्यात आली होती. केंद्रसरकार प्रमाणेच प्रत्येक राज्यानी देखील नगरविकास खात्याची निर्मिती करून नगरविकासाची जबाबदारी त्या खात्यावर टाकली.

**5) नागरीकरणातील राष्ट्रीय आयोग :–** भारत सरकाने इ.स. 1985 ला नागरीकरणावरील हा राष्ट्रीय आयोग स्थापन केला असून, हा आयोग नगरविकासाच्या कार्याचा अभ्यास करून त्यांच्या कार्याला चालना देणारा महत्वाचा घटक आहे. या आयोगाने 15 ते 20 वर्षाच्या काळात अनेक अहवाल केंद्र सरकाला सादर करून नागरीकरणाच्या विविध पैलूवर प्रकाश टाकला. भविष्यात नागरी करणाचे प्रश्न किती उग्र स्वरूप धारण करू शकतात. हे आयोगाने अहवालाद्वारे दाखवून दिले. हया निर्माण झालेल्या उग्र स्वरूपावर उपाययोजना करता येतील हे देखील स्पष्ट केले.

**74 वी घटना दुरूस्ती :** पी.व्ही. नरसिंहराव यांचे सरकार असतांना सप्टेंबर 1991 मध्ये हे विधेयक संसदेत माडले लोकसभेने डिसेंबर 1992 मध्ये हे विधेयक मंजुर केले. त्याच महिण्यात राज्यसभेने मंजुरी दिल्यानंतर अर्ध्यापेक्षा जास्त घटक राज्याच्या कायदेमंडळाने संमती दिली. 20 एप्रिल 1993 पासून भारतीय राज्यघटनेतील 74 वी घटना दुरूस्ती म्हणून त्यांची अमलबजावणी सुरू झाली व या घटनादुरूस्तीने नागरी स्थानिक शासन संस्थेच्या स्वरूपात आमुलाग्र बदल घडवून आणला. पूर्वीच्या काही नागरी संस्था रद्द करण्यात येऊन तीन प्रकारच्या संस्था कायम करण्यात आल्या. त्या नगरपंचायत, नगरपरिषद व महानगरपालिका आहेत. या संस्थामार्फत नागरी प्रशासनाचे प्रश्न, समस्या प्रभावीपणे सोडविण्यात येत असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :–** केंद्र सरकाच्या वेगवेगळया आयोग व संम्मेलनामुळे नागरी स्थानिक स्वशासनामध्ये अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. यामुळे नागरी प्रशासन तत्परतेने कार्ये करीत असून जनतेच्या प्रश्नावर विचारमंथन करीत असलेले दिसून येते. तसेच नागरी संस्थांना सरकारचे मिळणारे अनुदान वेळेवर प्राप्त होत असून संस्थाना आर्थिक उत्पन्नाचे साधनेही उपलब्ध करून देण्यात आले. नागरी स्थानिक संस्था जनतेकरीता वेगवेगळया नविन योजना राबवित असलेल्या दिसून येत आहे. यामुळे जनतेचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे.

**संदर्भग्रंथ सूचि :–**

1) डॉ. सिरसाट :– भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था
2) कुलकर्णी अ.ना. भारतीय स्थानिक स्वशासन
3) डॉ. यमलवाड स्थानिक स्वराज्य संस्था
4) प्रा. व्ही.बी.पाटील :– महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था
5) डॉ. शांताराम भोगले :– भारतातील स्थानिक शासन
6) डॉ.दर्शनकार पंचायतराज आणि नागरी प्रशासन
7) माहेश्वरी एस.आर. भारत मे स्थानिय शासन

❑❑❑